# Washim District Police

**Nature of Work** :- **Seizing Illegal Liquor**

**Police Station** :- **Dhanaj**

**Date of Good Work done** :- **13/01/2023**

**Brief of the work done :-**

अवैधरित्या दारूची विक्री करणाऱ्यावर पोलीसांची कारवाई ; तीन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल.

**दणका • पोलिस अधीक्षकांच्या मार्गदर्शनात कारवाई**

## दारूची विक्री करणाऱ्यांवर गुन्हा

**वाशीम** , ब्युरो. धनज पोलिस स्टेशनतंर्गत अवैधरीत्या सुरू असलेल्या दारूविक्रीवर पोलिसांनी कारवाई करून तीन जणांवर गुन्हा दाखल केला. ही कारवाई 10 जानेवारी रोजी करण्यात आली.



घटनेबाबत प्राप्त माहितीनुसार एपीआय योगेश सुखदेव इंगळे यांना गुप्त बातमीदारकडून माहिती मिळाली की, दोन इसम धनज बु. गावाकडून दुचाकीवर अवैधरीत्या विनापरवाना देशी दारूची वाहतूक करून दोनद गावाकडे घेऊन जात आहेत. या माहितीवरून पो. स्टाफ संतोष राठोड, दिपाली पोहरे असे यांनी धनज बु. गावाकडून येणाऱ्या वाहनास थांबण्याचा इशारा केला. परंतु,सदर वाहनचालकाने दुचाकी न थांबविता दोनद गावाकडे वळवून निघून गेला, त्या दुचाकीचा पाठलाग केला असता, ते वाहन हे दोनद गावातील प्लाटमध्ये शिरले व तेथील एका गुराचे गोठ्यात त्यांनी त्यांचे गाडीवर चोरून आनलेले 3 प्लास्टिकच्या पांढर्या रंगाचे पोते सदर गोठ्यात एका इसमाच्या मदतीने उतरवून ठेवत असताना त्यांना पकडण्यात आले. त्यांचे ताब्यातील सदर खाकी पृष्ठाचे खोके पंचासमक्ष उघडून पाहिले असता त्यामध्ये 900 नग देशी दारू आढळून आली. एकूण 31 हतरी 500 रुपयांचा मुद्देमाल विनापरवाना वाहतूक करीत असलेला मिळून आला. सदर अवैध दारू विनापरवाना वाहतुककरिता गुन्ह्यात वापरलेली मोटार सायकल व वाहन चालवीत असलेल्या इसम दिनेश श्रीकृष्ण कराले रा. येवता बंदी ता. कारंजा पाठीमागे बसलेल्या इसम दत्ता महादेव इंगळे रा. वाढोण ता. नांदगाव खंडेश्वर जि.अमरावती तसेच किशोर पुंडलीक वडवाले रा. दोनद बु. ता. कारंजा यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.